**मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या मार्गदर्शनात पश्चिम द्रुतगती महामार्गावरील वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी विलेपार्लातील नवा उड्डाणपूल सेवेत**

**श्री. रामदास आठवले, माननीय राज्यमंत्री सामाजिक न्याय व अधिकारिता,  भारत सरकार, मुंबई उपनगराचे पालकमंत्री, श्री मंगल प्रसाद लोढा आणि MMRDAचे महानगर आयुक्त डॉ. संजय मुखर्जी, भाप्रसे यांनी उड्डाणपूल वाहतुकीसाठी केला खुला**

**छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या टी-२ येथील वाहतुकीला फायदा**

**मुंबई, 09 मार्च,** 2024

छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या टर्मिनल-२ च्या बाजूने पश्चिम द्रुतगती महामार्गावर वाढणारी वाहतूक लक्षात घेता मुंबई महानगर प्रदेश प्राधिकरणाने (MMRDA) ने उभारलेला उड्डाणपूल श्री. रामदास आठवले, माननीय राज्यमंत्री सामाजिक न्याय व अधिकरिता,  भारत सरकार, तर माननीय मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या मार्गदर्शनात मा.मंत्री कौशल्य,रोजगार,उद्योजकता व नाविन्यता, महाराष्ट्र राज्य तथा पालकमंत्री, मुंबई उपनगर श्री. मंगलप्रभात लोढा आणि एमएमआरडीएचे महानगर आयुक्त डॉ. संजय मुखर्जी, भाप्रसे,  यांनी  तर श्रीमती पूनम महाजन, खासदार , आमदार ॲड पराग अळवणी, यांच्या विशेष उपस्थितीत वाहतुकीसाठी खुला केला. या उड्डाणपुलामुळे टर्मिनल-2 आणि टर्मिनल-1 कडून वांद्याच्या दिशेने जाणाऱ्या गाड्यांना मोठा दिलासा मिळणार आहे. तसंच पश्चिम द्रुतगती महामार्गावर नंदगिरी गेस्ट हाऊसपासून होणाऱ्या वाहतूक कोंडीवरही कायमस्वरूपी तोडगा निघणार आहे. गर्दीच्या वेळी विमानतळावरील टर्मिनल-1 व 2 वर गाड्यांची प्रचंड गर्दी असते. त्यामुळे पश्चिम द्रुतगती महामार्गावर वाहतूक कोंडी होते. या उड्डाणपुलामुळे ही वाहतूक कोंडी टळणार असून त्यामुळे प्रदूषण कमी होईल आणि इंधनाचीही बचत होणार आहे.

हा उड्डाणपूल एका बाजूने जाण्यासाठीच असून त्यावर दोन मार्गिका आहेत. नंदगिरी गेस्ट हाऊसपासून ते भाजीवाडी येथील साईबाबा मंदिरापर्यंत 780 मीटरच्या या उड्डाणपुलामुळे आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या टर्मिनल-2 वरून वांद्याकडे जाणारी वाहतूक सुरळीत होईल. त्याशिवाय हा उड्डाणपूल सध्याच्या जुहू-विले पार्ले उड्डाणपुलाला समांतर आहे.

**बांधकामाच्या अनोख्या पद्धती**

हा उड्डाणपूल बांधण्यासाठी अभियांत्रिकीतील विविध अनोख्या पद्धती वापरण्यात आल्या आहेत. या उड्डाणपुलाचे गर्डर पोलाद आणि PSC पासून तयार झालेले आहेत. इंग्रजीतील T या अक्षराच्या उलट्या आकाराची पद्धत वापरून 74 मीटर लांबीचं बांधकाम केलं गेलं. या अनोख्या पद्धतीमुळे पोलाद आणि PSC चे गर्डर कोणत्याही तात्पुरत्या आधाराविना बांधणं शक्य झालं. परिणामी या उड्डाणपुलाचं बांधकाम सुरू

असताना वाहतुकीचा खोळंबा कमीत कमी झाला. तसंच या उड्डाणपुलाची लांबी आणि उंची नियंत्रित असल्याने बांधकामासाठी कमीत कमी भूसंपादन करावं लागलं.

**मुंबईकरांना कसा फायदा होईल?**

पश्चिम द्रुतगती महामार्गावरील टी-2 जंक्शनपासून वांद्रेपर्यंतची वाहतूक या उड्डाणपुलामुळे सुरळीत होणार आहे. टर्मिनल-2 जंक्शन ते वांद्रे आणि अंधेरी ते टर्मिनल-1 या दोन पट्ट्यांत नेहमी वाहतूक कोंडी होत होती. मात्र आता या उड्डाणपुलामुळे ही वाहतूक कोंडी सुटेल. पश्चिम द्रुतगती महामार्गावरील भुयारी रस्त्यावर होणारी वाहनांची कोंडीही यामुळे टळणार आहे. परिणामी प्रवासाचा वेळ आणि इंधन या दोहोंची बचत होणार आहे. वाहतूक सुरळीत झाल्यानंतर सिग्नलसाठीचा वेळही कमी होणार आहे. या उड्डाणपुलामुळे टर्मिनल-2 कडून वांद्रेकडे जाणाऱ्या वाहनांची क्षमताही वाढेल. हा उड्डाणपूल पश्चिम द्रुतगती महामार्गावरील या पट्ट्यातील वाहतूक कोंडीवर मोठा आणि कायमस्वरूपी उपाय ठरणार आहे.

यंदाचं वर्ष महाराष्ट्रासाठी आणि खासकरून मुंबई महानगर प्रदेशासाठी खूप खास आहे. या वर्षाच्या सुरुवातीलाच अनेक प्रकल्पांचं उद्‌घाटन झालं, तर पायाभूत सुविधांमधील रत्नं म्हणता येतील, अशा प्रकल्पांचे लोकार्पण सोहळेही थाटात पार पडले. मुंबई महानगर प्रदेशातील पायाभूत सुविधांचं जाळं अधिक सक्षम करण्यासाठी एमएमआरडीए सातत्याने प्रयत्न करत आहे. मुंबई महानगर प्रदेशाचं भवितव्य एमएमआआरडीएच्या च्या हाती सुखरूप आहे. या प्राधिकरणाच्या प्रत्येक प्रकल्पामुळे लाखो नागरिकांचं जीवन सुसह्य झालं आहे. त्यामुळे पश्चिम द्रुतगती महामार्गावरून प्रवास करणाऱ्या लाखो मुंबईकरांच्या वाहतूक कोंडीचा प्रश्न सोडवणारा हा पूल प्रवाशांसाठी वाहतुकीसाठी खुला झाल्यामुळे मला प्रचंड आनंद होत आहे अशी भावना माननीय मुख्यमंत्री, नगरविकास मंत्री आणि MMRDA चे अध्यक्ष श्री. एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केली.

मुंबई महानगर प्रदेश प्राधिकरणाचे महानगर आयुक्त डॉ. संजय मुखर्जी,भाप्रसे म्हणाले, **नाविन्यपूर्ण कल्पना आणि शाश्वत विकासाची कल्पना यांचा संगम घडवून आणत मुंबई महानगर प्रदेशातील कोट्यवधी लोकांचं जीवन सुसह्य करण्याचा आमचा निश्चय आहे. आमच्या या निश्चयामुळेच मुंबई महानगर प्रदेशातील लोकांना शाश्वत भविष्याची फळे चाखायला मिळणार आहेत. अगदी अलीकडच्या काळात आम्ही पूर्ण केलेल्या प्रकल्पांद्वारे आम्ही ते सिद्ध केलं आहे. पश्चिम द्रुतगती महामार्गावरील हा नवा उड्डाणपूलही एमएमआरडीएच्या वेळेत योग्य तंत्रज्ञानासह काम करण्याची पोचपावती देतो. आणि कठोर परिश्रम घेत एमएमआर मधील वाहतुक सुलभ करण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत.**

**The Innovative Flyover at Vile Parle - Inaugurated Under the Guidance of the Hon'ble Chief Minister Shri Eknath Shinde**

**The flyover was opened by the hands of the Minister of State for Social Justice and Empowerment Shri Ramdas Athawale, the Guardian Minister of Mumbai Suburban Shri Mangal Prabhat Lodha and the Metropolitan Commissioner of MMRDA.**

**Mumbai, 9th March 2024:**

Shri Ramdas Athawale, Minister of State, Social Justice and Empowerment, Maharashtra and Under the formidable guidance of the Hon'ble Chief Minister of Maharashtra Shri Eknath Shinde, Shri Mangal Prabhat Lodha, Guardian Minister, Mumbai Suburban, and Dr Sanjay Mukherjee, IAS, Metropolitan Commissioner, MMRDA, facilitated the iauguration of the Flyover on the Western Express Highway at Vile Parle, in the auspicious presence of Smt Poonam Mahajan, Member of Parliament, Maharashtra, and Shri Parag Alavani, Member of the Maharashtra Assembly. The Flyover was opened for public use followed by the inauguration ceremony. This intuitive and innovative accomplishment on the WEH was conceived by MMRDA as a pathway to improve the Chhatrapati Shivaji Maharaj International Airport Domestic Terminal (T1) Junction. The T1 Junction is known to be occupied by thousands of vehicles during peak hours, leading to prolonged disruptions in traffic. Thus, this flyover's inauguration opens up a new and effective route to ease the movement of traffic headed towards Bandra from the International Airport T2, thereby preventing traffic congestion, reducing pollution, and promoting passenger safety on the WEH.

The newly inaugurated 2-lane One-way Flyover constitutes a length of 790 m, including the length of the approaches. It covers a width of 8m, and it extends between Nandgiri Guest House and Sai Baba Mandir, Bhajiwadi to accommodate the Bandra-bound traffic from International Airport T2. Moreover, this flyover is strategically positioned on the WEH at the parallel end of the Juhu – Vile Parle Elevated Flyover. The construction of this flyover witnessed the implementation of various innovative procedures, including the use of Steel and PSC Girders. The spans that are 74 m (46 m + 28 m) in length were launched using the groundbreaking technique called the inverted T arrangements. This technique permitted the launch of the Steel and PSC Girders in the complete absence of temporary supports, promising a notable reduction in traffic disruptions. Moreover, the reduced length and the controlled height of the flyover ensures a limited use of land, which in turn, limits the necessity for land acquisitions and reduces the flyover's land footprint. Furthermore, the innovative design of the flyover enhances its aesthetic appeal, in addition to making it less intrusive and cost-effective.

The movement of traffic from the T2 Junction to Bandra will be streamlined owing to the existence of this flyover. In particular, the new flyover will put an end to the conflicts that arise between the traffic from the T2 Terminal to Bandra and traffic from Andheri to the T1 Terminal / Vile Parle. Moreover, the intersections that lie beneath the WEH will be decongested, paving the way for better connectivity, reduced travel durations, and limited fuel consumption. A smoother facilitation of traffic will be observed alongside a reduction in signal times, and the capacity of the traffic moving from International Airport T2 to Bandra will also be expanded. Hence, the new flyover is assured to introduce a whole new level of accessibility, convenience, and safety to the riders that frequent the WEH.

Hon'ble Chief Minister of Maharashtra, Urban Development Minister, & the Chairman of MMRDA Shri Eknath Shinde expressed **"This year is off to a great start for the state of Maharashtra, especially for the Mumbai Metropolitan Region with the inaugurations, as well as the ceremonial beginnings of various infrastructural marvels. Our government stands together with the MMRDA as a consistent source of guidance and encouragement in its noble mission to transform the urban infrastructure of the MMR, every step of the way. The MMR's future is in better hands with MMRDA, and every feat achieved in the name of the MMR will benefit the citizens of Maharashtra, in one way or another. So, I am elated to have lent my guidance to the inauguration of this wonderful flyover that will bring innumerable benefits to Mumbaikars by reducing the adverse effects of traffic congestion on the WEH."**

Dr Sanjay Mukherjee, IAS, Metropolitan Commissioner, MMRDA said **"Our commitment to integrating the fruits of innovation with the indomitable ideal of sustainability has helped us in many ways to enforce our vision dedicated to the people of the MMR. This vision of MMRDA promises a sustainable future for the MMR's residents, and our recent accomplishments are testaments to the fact that this future will arrive sooner rather than later. The flyover on the WEH continues to add meaning to the legacy of MMRDA by incorporating innovation and sustainability in its design and implementation. Thus, the inauguration of this one-of-a-kind flyover motivates us to embrace even more innovative directions in the forthcoming years to empower the future of the MMR."**